आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय  कुळगाव बदलापूर

## अहवाल

## **मातृदिन २०२२**

आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या, आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगाव - बदलापूर यांच्या वतीने गेली १४ वर्ष सातत्याने मातृदिन सोहळा साजरा केला जातो. यावर्षीचे हे १५ वे वर्ष होते. वर्ष  शैक्षणिक २०१९-२० यावर्षी संस्थेने हीरक महोत्सव व महाविद्यालयाने रौप्य महोत्सव साजरा केला. तर यावर्षी 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी' वर्ष असल्याने 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' व 'हर घर तिरंगा' या संकल्पनेवर आधारित '  दि. २६ ऑगस्ट २०२२ रोजी 'मातृदिन सोहळा २०२२ महाविद्यालयाच्या सुसज्ज सभागृहात साजरा करण्यात आला साजरा करण्यात आला होता.

या प्रसंगी सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य करणाऱ्या , देशसेवेचे व्रत घेऊन झटणाऱ्या मा. श्रीमती सुमेधा चिथडे, संस्थापक, सचिव, सोल्जर्स इंडिपेंडेंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशन, पुणे यांना दरवर्षीचा  'आदर्श वसुंधरा माता पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले होते. या  पुरस्कारराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, शाल , श्रीफळ,  भेटवस्तू व रोख रक्कम असे होते.

याच बरोबर प्रतिकूल परिस्थितीत आपल्या पाल्यांचे शिक्षण पूर्ण करत असल्याबद्दल दोन  विद्यार्थिनींच्या  मातांना 'पालक माता' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या,  डॉ. संगीता पांडे म्हणाल्यात की, रोज डे, चॉकलेट डे,  अशा सारखे डे नेहमीच साजरे करतोय परंतु  'सर्वांनी आजच्या सोहळ्याचे महत्व लक्षात घेऊन आपल्याला जन्म देणाऱ्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करा. आणि देशसेवेसाठी तत्पर रहा'. असे उपस्थित युवकांना आवाहन केलं. तर प्रास्ताविकानंतर मातृदिनाचे औचित्य साधून छोटा शिशु ते महाविद्यालयस्तरावर झालेल्या विविध स्पर्धेतील बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचे सादरीकरण करण्यात आले होते. यात सादर केलेल्या स्पर्धकांनी आपल्या कलागुणांनी उपस्थितांचे मने जिंकलीत.

तर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या   सत्कारमूर्ती मा. श्रीमती सुमेधा चिथडे यांनी सत्काराला उत्तर देताना , 'भारतीय सैनिकांच्या अनेक विरगाथा ऑडिओ-व्हिडिओच्या माध्यमातून  सांगत असतानाच 'आपले जीवन शुद्ध आणि पवित्र असले पाहिजे.  इतराप्रति समर्पित असले पाहिजे.  त्यासाठी आपल्या ध्येयाचा ध्यास कायम असला पाहिजे. आपणही असे काही काम करा की,  आपल्यासोबत इतरांनाही सेल्फी काढण्याची इच्छा निर्माण झाली पाहिजे. जे विचार आपल्या मनातील कृतीतून उतरतात,  त्याला जीवन म्हंटले पाहिजे.  हे आपले संस्कार आहेत. आपल्या सैनिकामुळे आपले जीवन सुरक्षित आहेत. त्यांच्यासाठी घरात रोज एक पणती लावली पाहिजे. स्वतः पलीकडे जाऊन राष्ट्राचा विचार करणाऱ्यांची आरती गायली पाहिजे. आपल्या सैनिकांचे पहिले उद्दिष्ट्ये राष्ट्राची सुरक्षितता हे  आहे. त्यानंतर तिथले त्यांचे सहकारी, त्यानंतर त्यांचे घर आहे.  असे संस्कार आपले सैन्य आपल्याला सांगते. राष्ट्राने मला काय दिले त्यापेक्षा मी राष्ट्राला काय देऊ शकते?  याचा विचार करुन स्वतः जगातल्या सर्वोच्च रणभूमीवर सैनिकांसाठी ऑक्सिजन जनरेट प्लांट भेट दिला. परमेश्वराने बुध्दी दिली, समाजाने साथ दिली आणि युद्धभूमीने संधी दिली'. याचा आनंद व्यक्त केला. आपले नाव  जगात  कोरले जावे. असे जगले पाहिजे. राष्ट्रातला कोणताही प्रश्न असो. त्यावर भाष्य

करण्यापेक्षा मी काय करू शकतो? याचा विचार केला पाहिजे. आपल्या दुःखाचा बाऊ न करता जगा. असा संदेश सैन्य आपल्याला देते.' तिरंग्याच्या तीन रंगाचे समजून घ्या. असेही आवाहन या प्रसंगी केलें.

या सोहळ्याचे समारोपीय मार्गदर्शन करताना मा. श्री. रामभाऊ पातकर म्हणाले की, प्रत्येकाने एक रोप भेट देऊन आपले परिसर ऑक्सीजन युक्त करा. भारत देश महान आहे. हे जगाला दाखऊ या. यानंतर बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना बक्षिस देण्यात आलेत.

याप्रसंगी आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, मा. श्री. जनार्दनजी घोरपडे, सहसचिव मा. श्री. प्रा. पंढरीनाथजी बावीस्कर, विश्वस्त मा. श्री. तुषारजी आपटे, विश्वस्त मा. श्री. रामभाऊ पातकर, तसेच संस्थेचे माजी सचिव मा. श्री. दत्तात्रय कुलकर्णी, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या, डॉ. संगीता पांडे, विविध शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थीवर्ग व पालकवर्ग तसेच परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.